--: प्रेस नोट:- दिनांक ०९/१०/२०२१

दि.०३/०७/२०२१ रोजी फिर्यादी यांचे पती व सासरे यांना १६:०० वा.सुमारास बोरीवली येथे मिटींगसाठी जायचे असल्याने, उबेर टॅक्सी बुक करण्यासाठी फिर्यादीने त्यांचे स्वत:चे मोबाइलवरून उबर टॅक्सीचा एजंन्ट (आरोपी) याचे ७००४६५०५३७ या मोबाइलवर कॉल केला परंतु टॅक्सी बुक केली नाही. त्यानंतर त्यांना परत साधारण १८:०० वा सुमारास फिर्यादीचे पतीने आरोपीतास पुन्हा कॉल करून,उबेर बुक केली. परंतु ते उबर टॅक्सीने बोरीवलीवरून त्यांचे निवासस्थानी येत असताना, आरोपीने दिलेल्या टॅक्सी ड्रायव्हरने अचानक जास्त भाडयाची मागणी केल्याने व एसी चालु नसल्याने नमुद उबेर टॅक्सीतुन फिर्यादीचे पती व सासरे कांदीवली येथे उतरले व तेथून दुस-या टॅक्सीने आले.

त्यानंतर सदर घटनेचा राग मनात धरून दि.०४/०७/२०२१ रोजी २०:०० वा. सुमारास फिर्यादीचे मोबाइलवर आरोपीत याने व्हॉटसअॅपद्वारे शिवीगाळ सुरू केली. त्यानंतर वेगवेगळया मोबाइल नंबरद्वारे फिर्यादी व त्यांचे पती यांचे मोबाइलवर विविध राष्ट्रीय व आंतर राष्ट्रीय मोबाईल वरून व्हॉटसअपद्वारे विवस्त्र अवस्थेतील अश्लिल व्हिडीओ, धमकीचे/शिवीगाळ मॅसेज, अश्लिल मॅसेज, व्हिडीओ/वॉईस कॉल व अश्लील फोटो प्राप्त झाल्यावरून लो. टि. मार्ग पोलीस ठाणेकडुन तात्काळ दखल घेवुन गु.र.क्र.८६३/२१ कलम ३५४(ड)(२), ५०४,५०६,३४ भा.द.वि.सह कलम ६७(अ) माहीती तंत्रज्ञान कायदा २००० अन्वये दि.०५/०७/२०२१ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरचा गुन्हा हा मंहिलांविरूध्दचा असल्याने फिर्यादी व त्यांचे कुटूंबियांमध्ये भितीचे व असुरक्षिततेचे वातावरण पसरू नये म्हणुन गुन्हयातील आरोपीचा तात्काळ शोध घेण्याचे प्रयत्न सुरू करण्यात आले. सदर गुन्हयातील आरोपीबाबत कोणतीही माहिती उपलब्ध नसताना तांत्रिकदृष्टया तपास करून आणि गोपनीय माहिती प्राप्त करून नमुद गुन्हयातील पाहिजे आरोपी उत्सवकुमार प्रमोद शुक्ला, उम्र- १८ वर्ष यास बिहार येथे पोलीस पथक पाठवून स्थानिक पोलीस ठाणेची मदत घेवुन सापळा रचुन दोन दिवस बिहार येथे पर राज्यात अथक प्रयत्न करून गुन्हयातील पाहिजे आरोपीतास शिताफिने ताब्यात घेतले. तपासा दरम्यान आरोपीताने फिर्यादी यांना त्रास देण्याच्या हेतुने फिर्यादी यांचा नंबर विविध अश्लिल वॉटस्अॅप ग्रुपवर मॅसेज वायरल केला असल्याचे सांगितले.

सदरची यशस्वी कामगिरी ही मा. पोलीस सह आयुक्त, का व सु, श्री.विश्वास नांगरे- पाटील , मा. अपर पोलीस आयुक्त, द.प्रा.वि.,मुंबई श्री.दिलीप सावंत, मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२, डॉ. सौरभ त्रिपाठी, सहाय्यक पोलीस आयुक्त, पायधुनी विभाग श्री.राजेंद्र चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.दिपक निकम, पोलीस निरीक्षक मंगेश हांडे, पोउनि विनोद पवार, पो.ना.०१. १६६/माळगावकर, पो.शि.११-१६१०/काठे, पो.शि.१३.४२७/शिंदे यांनी पार पाडली आहे.

(दिपक निकम)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
लो.टि.मार्ग पोलीस ठाणे, मुंबई